# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक ३१४/२०२४** **दिनांक- १९/०८/२०२४.**

## "२४ वर्षापासुन बलात्कारातील पाहिजे आरोपीचा शोध घेऊन त्यास अटक करुन ऑगस्ट-२०२४ महात एकुण ०६ पाहिजे आरोपींचा शोध घेण्यात विरार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

दि. २१.०५.२००१ रोजी तक्रारदार हया त्यांचा चुलत भावाच्या लग्नाला गाव-कोळोशी ता.वसई येथे आल्या असतांना पहाटे ०५.३० वा. चे सुमारास ५ (पाच) आरोपीतांनी फिर्यादी यांना घराचे बाजुला शेतात घेऊन जाऊन तिचे इच्छेविरुध्द जबरी संभोग केला होता. सदरबाबत **विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ९१/२००१ भा.दं.वि.सं.कलम ३७६(२),३२३,३४ प्रमाणे** गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पोलीस आयुक्त, व अपर पोलीस आयुक्त, यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामधील पोलीस ठाणे अभिलेखावरील पाहिजे व फरार आरोपीतांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथक अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदारांकडुन माहिती काढुन प्राप्त माहितीचे आधारे २४ वर्षापासुन ३७६ (बलात्कार) सारख्या गंभिर गुन्हयातील आरोपी शांताराम विणा (इनु) वरटा, वय ४९ वर्षे, रा. ठाणेकरपाडा, ता. वसई, जि. पालघर हा नातेवाईकानां भेटण्याकरिता त्याचे अधुन मधुन राहते गावी येणार असल्याची माहीती मिळुन आली होती. त्याप्रमाणे सापळा रचुन आरोपीस शिताफीने ताब्यात घेऊन त्याच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने बारकाईने विचारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली देऊन तो मागील **२४ वर्षापासुन** स्वतःचे अस्तित्व लपवुन राहत होता.

सदर गुन्हयात मा. न्यायालयाने अटक केलेल्या इतर आरोपीतांना दि. १९.११.२००५ रोजी दोषी ठरवुन कलम ३७६(२)(ग) मध्ये प्रत्येकी ५ वर्षे सक्त मजुरी व २,०००/- रु. दंड, दंड न भरल्यास ६ महिने सक्त मजुरी व कलम ३२३ मध्ये १ वर्षे साधी कैद व ५००/- रु. दंड, दंड न भरल्यास १ महिला साधी कैद शिक्षा दिलेली होती. सदर गुन्हयात पाहिजे आरोपी हा मिळुन आल्याने त्यास सदर गुन्हयात दि. १७.०८.२०२४ रोजी अटक करुन मा. न्यायालयात हजर केले आहे. मा. न्यायालयास सदर आरोपी विरुध्द न्यायहेतुसाठी लवकरच पुरवणी दोषारोप पत्र सादर करण्यात येणार आहे.

वरिष्ठांनी केलेल्या सुचनांच्या आधारे कार्यपध्दती राबवुन ऑगस्ट-२०२४ या महात विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन आजपावेतो एकुण ०६ पाहिजे आरोपीतांचा शोध घेण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत भजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-३, श्री. बजरंग देसाई, सहा पोलीस आयुक्त, विरार विभाग, श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोउनि/अविनाश हाटखिळे, पोउनि/भाऊ डुबे, सहाफौज/विजय सुर्यवंशी, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील तसेच पोअं/संदिप शेळके, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, प्रफुल सोनार यांनी सदरची कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली आहे.



**--------------0000--------------**